

दस्ताना

एक यूक्रेनी लोककथा




मराठी : अश्विनी बर्वे





हिवाळ्यातला सगळ्यात थंड दिवस होता. जंगलात हळूहळू चालत एक छोटा मुलगा जाळण्यासाठी लाकडं गोळा करत होता. त्याच्या आजीने त्याला लाकडं आणण्यासाठी पाठवले होते.

“जितके लाकडं आणू शकशील तितकी आण,” आजी म्हणाली. आजी स्वतः बसल्या बसल्या हातमोजे विणत होती. “उत्तरेकडून थंडी हवा येत आहे. थंडी अधिक वाढेल. आपल्या घराला गरम ठेवण्यासाठी आपल्याला चांगली शेकोटी पेटवावी लागेल. त्यासाठी भरपूर लाकडे लागतील..”




सकाळपासून छोटा मुलगा लाकडं गोळा करत होता. त्याची स्लेज गाडी भरेपर्यंत त्याने लाकडं गोळा केली.


मग एक विचित्र गोष्ट घडली. जेव्हा तो शेवटचे लाकूड उचलू लागला तेव्हा त्याचा हातमोजा हातातून निघून बर्फावर पडला.

आता हिवाळ्याच्या सगळ्यात थंड दिवशी असे बेपर्वा कोणी वागेल का? या प्रश्नाचे उत्तर मला कधीच मिळणार नाही, कारण ही गोष्ट मला माझ्या आजोबांनी सांगितली आहे.

लाकडं भरलेली स्लेज गाडी घेवून तो मुलगा घराकडे निघाला आणि त्याचा हातमोजा तिथेच बर्फात राहिला.



तो मुलगा तिथून जाताच एक छोटा उंदीर झाडांच्या मधून पळत तिथं आला. त्याला खूप थंडी वाजत होती. त्याची नजर त्या मुलाच्या हातमोज्यावर पडली. थंडी पासून वाचण्यासाठी तो हातमोज्यात आला. त्या छोट्या उंदरासाठी त्या हातमोज्यात खूप जागा होती. हातमोजा आतून मऊ आणि उबदार होता. उंदीर आरामात हातमोज्यात बसला.



तेव्हाच हिरवे बेडूक उड्या मारत तिथे पोहचले.

“कोणी आहे का आत?” त्याने मोज्याजवळ येवून विचारले.

“फक्त मी आहे,” उंदीर म्हणाला. “या थंडीत तू गोठण्याआधी पटकन तू आत ये.”










त्या उबदार मोज्यात दोघे आरामात बसले होते की तिथं एक घुबड आले.

“मी या सुंदर हातमोज्यात येवू शकतो का?” घुबडाने विचारले.

“येवू तर शकतो,पण इथे नीट वागायचे,” उंदरीण म्हणाली. कारण घुबड जवळ असले की ती घाबरून जात असे.

“आणि आत आल्यावर हलायचे डूलायचे नाही,” हिरव्या बेडकाने म्हटले. “इथे आत जागा थोडी कमी आहे.”





थोडा वेळ होत नाही तर एक ससा जंगलाच्या रस्त्याने चालत चालत तिथं आला.

“या सुंदर अशा उबदार हातमोज्यात माझ्यासाठी थोडी जागा होईल का?” सशाने विचारले, “आज बाहेर खूप जास्त थंडी आहे.”

“आता जास्त जागा राहिली नाही,” उंदरीण, बेडूक आणि घुबड एकदमच म्हणाले. “पण तू आत ये, तुझ्यासाठी काय करता येईल हे आम्ही बघतो.”







ससा हातमोज्यात घुसत नाही तोच एक कोल्हा घाई – घाईत तिथं आला. आणि मोठ्या कष्टाने ती ही हातमोज्यात घुसली.

आता उंदरीण विचार करू लागली की, तिने इतकं दयाळू व्हायला नको होतं. पण ती करू तरी काय शकत होती? बाहेर खुप थंडी होती आणि अशावेळी दुसऱ्यांना मदत तर करायलाच हवी होती.

सगळेजण कसबसे हातमोज्यात बसत नाही तर पांढरा लांडगा तिथं येवून पोहचला. थंडीपासून वाचण्यासाठी त्यालाही हातमोज्यात यायचे होते.

"मला समजत नाही की, आपण सगळे या हातमोज्यात कसे मावू? उंदरीण म्हणाली, "तरीपण आपण प्रयत्न तर करूच शकतो."



सगळेजण थोडे इकडे तिकडे हालले, मागे-पुढे सरकले, डावीकडे उजवीकडे झाले. आणि मग खूप प्रयत्नानंतर लांडगा आत आला.

आता आत खूप गर्दी झाली होती. पण कमीत कमी थंडी तर वाजत नव्हती. हातमोज्यात चांगली ऊब होती.





जसे सगळेजण ठीकठाक होवून आरामात हातमोज्यात बसले, तसे कोणाच्या तरी फुफकारण्याचा आवाज ऐकू आला. बाहेर एक जंगली डुक्कर होते. त्यालाही थंडीपासून वाचण्यासाठी आत यायचे होते.

“हे देवा! उंदरीण ओरडली कारण हातमोजा आधीच फुगला होता. आता तर आत अजिबात जागा नाही.”




“घाबरू नका, आत येतांना मी काळजी घेईन,” डुक्कर म्हणाले. एवढं म्हणून तो कशाही प्रकारे आत आलाच. मग उंदरीण, बेडूक, घुबड, आणि ससा, कोल्हा, लांडगा यांच्याबरोबर ते ही अंग चोरून बसले. मला हे सगळं यासाठी माहित आहे की, आजोबांनी मला हे सगळं सांगितलं आहे.





हातोमोज्यात सगळेजण मोठ्या कष्टाने बसले होते. परंतु यापेक्षाही वाईट वेळ येणार होती कारण आता अस्वल तिथं येवून पोहचले होते. ते खूप मोठे होते आणि त्याला खूप थंडी वाजत होती.

“इथे आत बिलकुल जागा नाही, बिलकुलच नाही,” अस्वलाने काही म्हणायच्या आतच हातमोज्यात असणाऱ्या सगळ्यांनी एकदम म्हटले.




"काय मुर्खा सारखे बोलत आहात?" लांडग्याने मोठ्या आवाजात म्हटले. "तुम्हाला ती म्हण माहित नाही का? एका अतिरिक्त प्राण्यासाठी नेहमी थोडी जागा ही असतेच."

आणि कोणत्या विनंतीशिवाय लांडगा हातमोज्यात घुसला. आधी त्याने आपला एक पंजा हातमोज्यात ठेवला. हातमोजा थोडासा उसवला. मग त्याने दुसरा पंजा आत ठेवला.हातमोज्याची शिवण थोडीशी उसवली. मग त्याने खोल श्वास घेतला आणि तो हातमोज्यात घुसलाच..



आता जेव्हा लांडगा हातमोज्यात घुसण्याचा प्रयत्न करत होता, तेव्हा एक छोटा काळा नाकतोडा तिथं आला. नाकतोडा खूप म्हातारा होता आणि त्याचे वाकड्यातिकड्या पायांत थंडीमुळे खूप वेदना होत होत्या. हातमोजा बघून त्याने आपल्या आपल्याला सांगितलं, “अरे, ही तर खूप उबदार जागा आहे. याच्या आत थंडीपण वाजणार नाही. मी उडी मारून याच्या आत जाईन आणि गुडूप बसेल.





त्या नाकतोड्याने जसे आपले पाय हातमोज्यात घुसवले तशी हातमोज्याचे सगळे टाके उसवले. ताड ताड, कडाक. हातमोज्याची आतली जुनी कातडी फाटली. त्याच्या आत असलेली उबदार, मऊ लोकर सगळी तुटली. आत बसलेले सगळे प्राणी धडाम करून बर्फावर पडले.



त्याच वेळी त्या छोट्या मुलाच्या लक्षात आले की त्याने एकच हातमोजा घातला आहे. दुसरा जंगलात कुठे पडला होता. ज्या हाताचा मोजा पडला होता, तो हात थंडीने पार गोठला होता.

आपला हातमोजा शोधायला तो परत जंगलात गेला. पण तिथं त्याला काय मिळालं? त्या हातमोज्याचे फाटलेले तुकडे, जे इकडे तिकडे पडलेले होते.

तेव्हाच त्याला वाटले की त्याने एका उंदरीण पळतांना पाहिली, जिच्या डोक्यावर लाल लोकर लागली होती. ती तीच उबदार लोकर होती, जी हातमोज्याच्या अंगठ्याला लावलेली होती.

“हरकत नाही,” तो स्वतःलाच म्हणाला. आणि त्याने आपला गारठलेला हात खिशात घातला. “माझ्या आजीने आत्तापर्यंत माझ्यासाठी नवीन हात्म्मोजे विणले असतील.”.

मग तो पटपट आपल्या घराकडे निघाला. उत्तरेकडून येणारी थंड हवा त्याच्या चेहऱ्याला सुई सारखी टोचत होती.



आणि माझे आजोबा म्हणायचे की, त्यांना कधीच कळले नाही की, त्या हातमोज्याचे नक्की काय झाले ते?

